# सहयोगी
# शिक्षण अभियान

# उपक्रम पुस्तिका
# व
# सारथी मार्गदर्शिका

# अनुक्रमणिका

## भाग १ : मूल्यवर्धन उपक्रम


| अ. क्र. | उपक्रम | पृष्ठ क्र. | अ. क्र. | उपक्रम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| | **विभाग १ : मी आणि माझ्या क्षमता** | | ९. | खोटे का बोलू नये? | १८ |
| १. | कोठे आहे? | ३ | १०. | खोटे बोलण्याचे परिणाम | १९ |
| २. | तुझे नाव काय? | ४ | | **विभाग ३ : माझे नातेसंबंध** | |
| ३. | तू कोठे राहतोस? | ४ | १. | प्रत्येकाबद्दल आदर बाळगूया | २१ |
| ४. | माझे कुटुंब | ५ | २. | नम्र की उद्धट | २१ |
| ५. | माझी शाळा | ५ | ३. | माझे मित्र–मैत्रिणी | २२ |
| ६. | शाळेसंदर्भात अधिक काही | ६ | ४. | खरे मित्र | २२ |
| ७. | माझे आवडते प्राणी–पक्षी | ६ | ५. | चांगला मित्र कोणता? | २३ |
| ८. | माझे आवडते रंग | ७ | ६. | नवे मित्र जोडणे | २४ |
| ९. | माझा आवडता खेळ | ७ | ७. | मोठी माणसे आपली काळजी कशी घेतात? | २४ |
| १०. | खाण्याच्या आवडीनावडी | ८ | ८. | आपण इतरांची काळजी कशी घेऊ शकतो | २५ |
| ११. | माझा आनंद | ९ | ९. | सागर दुःखी का आहे? | २५ |
| १२. | मला राग कधी येतो? | ९ | १०. | आम्ही चिडवणार नाही | २६ |
| १३. | राग व्यक्त करताना | १० | | **विभाग ४ : मी आणि आपले जग** | |
| १४. | शांत बसणे | १० | १. | आपण वेगळे तरी सारखे | २७ |
| | **विभाग २ : माझ्या जबाबदाऱ्या** | | २. | कुटुंबीयांची कामे | २८ |
| १. | शांतता संकेत | १२ | ३. | उंदराची टोपी | २९ |
| २. | वर्गनियम | १२ | ४. | वेगवेगळी कामे करणारे लोक | ३० |
| ३. | खेळाचे नियम | १३ | ५. | पोळी भाजीचा संवाद | ३१ |
| ४. | सार्वजनिक ठिकाणी नियमांचे पालन | १४ | ६. | सहकार्याची गोष्ट | ३२ |
| ५. | आरोग्याच्या चांगल्या सवयी | १५ | ७. | सभोवतालची झाडे | ३३ |
| ६. | घरची कामे | १६ | ८. | पाण्याचे उपयोग | ३४ |
| ७. | योग्य–अयोग्य वर्तन | १७ | ९. | आपले पाण्याबद्दलचे घोषवाक्य | ३५ |
| ८. | वस्तूंचा योग्य वापर | १७ | १० | मूल्यांकन | ३६ |

## ८. माझे आवडते रंग

**अध्ययन निष्पत्ती :** १. मुले त्यांच्या अवतीभोवती असणाऱ्या वस्तूंचे रंग ओळखतात. स्वत:ला आवडणारे रंग सांगतात.
२. मुले विविध आकार काढतात आणि ते त्यांच्या आवडत्या रंगांनी रंगवितात.

**आवश्यक बाबी :** कोरे कागद (विद्यार्थी संख्येइतके) तेलखडू (क्रेयॉन)

१. मुलांना सांगावे : आज आपण आपल्या आवडत्या रंगांबद्दल बोलूया.
२. मुलांच्या जोड्या कराव्या.
३. मुलांना सांगावे : आजूबाजूच्या निरनिराळ्या वस्तू पहा. त्यांचे रंग लक्षात ठेवा.
४. आवश्यकता असेल तर मुलांना फिरू द्यावे.
५. काही मुलांना सांगावे : तुम्ही पाहिलेली एखादी वस्तू आणि तिचा रंग सांगा.
६. मुलांना सांगावे : तुम्हाला दिसलेल्या सर्व वस्तू व त्यांचे रंग तुमच्या जोडीदाराला सांगा.
७. काही जोड्यांना वस्तू आणि त्यांचे रंग वर्गासमोर सांगू द्यावे. इतर मुलांना विचारावे : काही वस्तू/रंग सांगायचे राहिले आहेत का?
८. मुलांकडून काही रंगांची नावे सांगायची राहिल्यास त्यांना सूचक प्रश्न विचारावे. उदाहरणार्थ : खिडकीचा रंग कोणता आहे?
९. काही वस्तूंच्या रंगांची नावे मुद्दाम चुकीची सांगावी व मुलांना ती दुरुस्त करून सांगू द्यावी. उदाहरणार्थ : सतरंजीचा रंग काळा आहे का?
१०. मुलांना सांगावे : तुम्हांला दिलेल्या कोऱ्या कागदावर कोणताही एक आकार काढा व तुमच्या आवडत्या रंगाने रंगवा.
११. मुलांना सांगावे : तुम्ही काढलेली आणि रंगविलेली चित्रे तुमच्या जोडीदाराला दाखवा.
१२. मुलांना विचारावे : आपल्या सर्वांना एकच रंग आवडतो का?

## ९. माझा आवडता खेळ

**अध्ययन निष्पत्ती :** १. मुले ते काही खेऴ कसे खेळतात, याचे वर्णन करून सांगतात.
२. मुले अभिनयावरून खेळ ओळखतात.

१. मुलांना सांगावे : आज आपण आपल्या आवडत्या खेळाबद्दल बोलणार आहोत.
२. मुलांना विचारावे : तुम्ही कोणकोणते खेळ खेळता?
३. मुलांची उत्तरे लक्षात ठेवावी.
४. मुलांना विचारावे :
   - तुम्हांला कोणता खेळ सर्वांत जास्त आवडतो?
   - प्रत्येकाला एकच खेळ खेळायला आवडतो का?
५. काही मुलांना ते त्यांचा आवडता खेळ कसा खेळतात, ते स्पष्ट करायला सांगावे.
६. जर एखाद्याने सर्वांना माहीत नसलेल्या खेळाचे नाव सांगितले तर तो खेळ कसा खेळतात, याबद्दल त्याला विचारावे.

# अनुक्रमणिका

## विभाग ३ : गाणी


| अ. क्र. | उपक्रम | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १. | अगडम् बगडम् | ६३ |
| २. | दोन लहान उंदीर | ६३ |
| ३. | चट चट चटणी लसणाची | ६३ |
| ४. | चिवचिव चिमणी | ६४ |
| ५. | गाडी आली | ६४ |
| ६. | आलं मिरची लसूण | ६४ |
| ७. | काकडी गं काकडी | ६५ |
| ८. | भाजी घ्या भाजी | ६५ |
| ९. | गाडी आली गाडी आली | ६५ |
| १०. | सर्कसवाला | ६६ |
| ११. | माझी अंघोळ | ६६ |

## १०. सर्कसवाला

(अभिनय गीत)

सर्कस वाला आला हो सर्कस वाला आला,
दाखवा तिकीट चला चला
तंबूमध्ये बसा चला
खेळ सुरू झाला हो, खेळ सुरू झाला... ।।धृ. ।।

हे तर आले कोण हो,
लांब्या ढांगा टाकीत हो,
उंच उंच मान हो
उंट दादा आले हो... ।।१।।

हे तर आले घोडे स्वार, टप् टप् घोडा चालविणार
चाल यांची डौलदार, रिंगणात आला हो... ।।२।।

लुकलुक बघती हत्ती हो, सुपाएवढे कान हो
हलविती सोंड हो, सलाम करती तुम्हांला हो... ।।३।।

घेऊन हाती फिरतो काठी, विदुषकाची ऐटच मोठी
मध्येच मारी हा कोलांटी, खेळ खलास झाला हो... ।।४।।

सर्कसवाला गेला हो, सर्कसवाला गेला हो.

## ११. माझी अंघोळ

हात, पाय, अंग धुतो
रोज मजेत अंघोळ करतो
अंगाला साबण लावतो
पांढरा पांढरा फेस होतो.

हातावर पांढरा फेस
पायावर पांढरा फेस
अंगावर पांढरा फेस
सगळीकडे फेसच फेस.

अंगावर पाणी घेतो
फेस सगळा पळून जातो
जाता जाता आमच्या
अंगाला गुदगुल्या करतो.

किती वेळ चालली अंघोळ?
आई तिकडून ओरडते
अंग पुसून खसखसा
बाहेर यायची गडबड उडते.

⦿⦿⦿

# अनुक्रमणिका

## विभाग ४ : कला उपक्रम


| अ. क्र. | उपक्रम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | आवडीप्रमाणे चित्र काढणे | ६८ |
| २. | आकार | ६८ |
| ३. | आपले कुटुंब | ६९ |
| ४. | रांगोळीचा नमुना | ६९ |
| ५. | चौरसांचा वापर केलेली रचना | ६९ |
| ६. | पत्ती कला | ६९ |
| ७. | सहयोगी चित्र काढणे | ६९ |
| ८. | टेलिफोन डायरी | ७० |
| ९. | अल्बम | ७० |
| १०. | रद्दी कागदापासून हस्तकला | ७० |
| ११. | मातीची खेळणी | ७० |

# भाग ४ - कला उपक्रम

**प्रस्तावना :**

कोरे कागद, वही, रद्दी कागद, माती, पेन्सिल, तेलखडू इ. वस्तूंचा वापर करून अनेक कला आणि हस्तकलेचे उपक्रम आयोजित करता येतील. या उपक्रमांतून खालील उद्देश साध्य होतील :

- सूक्ष्मकारक व स्थूलकारक विकास, हस्त–नेत्र समन्वय व ज्ञानेंद्रियांचा विकास
- सर्जनात्मक विकास
- निरीक्षण क्षमतेचा विकास
- सामाजिक कौशल्यांचा विकास

खाली दिलेल्या उपक्रमाच्या आधारावर तुम्ही अनेक उपक्रम आयोजित करू शकता. उपक्रमानंतर प्रत्येक मुलाकडे जाऊन त्याने काय बनवले आहे त्याविषयी त्याला विचारावे. त्यांच्या प्रयत्नावर टीका करणे किंवा त्यांची चेष्टा करणे टाळावे. मुलांना एकमेकांनी तयार केलेल्या चित्र/वस्तू बघायला सांगावे. (शक्य असेल तर एका ठिकाणी मांडून ठेवावे). मुलांना त्यांनी तयार केलेल्या वस्तू घरी नेऊन पालकांशी त्याविषयी बोलायला सांगावे.

## १. आवडीप्रमाणे चित्र काढणे

हा उपक्रम ऐकायला जरी सोपा वाटला, तरी अनेक मुलांना तो दोन मुख्य कारणांमुळे अवघड वाटू शकतो :

(i) त्यांना कधीच स्वतःचा विचार करण्याची संधी दिली गेलेली नसते.

(ii) मुलांनी कशाचे चित्र काढावे व ते कशाप्रकारे काढावे याबाबत प्रौढ व्यक्तींच्या विशिष्ट अपेक्षा असतात आणि मुले त्या अपेक्षा पूर्ण करू शकत नाहीत.

यापैकी दुसरी गोष्ट तुम्ही टाळू शकता व मुलांना आपल्या मनाप्रमाणे चित्र काढू देऊ शकता. जर तुम्हांला त्यांना काही विषय सुचवायचे असतील, तर तुम्ही खालीलप्रमाणे ते सुचवू शकता :

- काही निसर्गदृष्ये (झाडे, फुले, डोंगर, नद्या, इ.)
- घर आणि एक झाड, फुले असलेले एक झाड, फुले, मासा, बोट, इ.
- मोबाईल फोन, टी.व्ही., कपाट किंवा दरवाजा यांसारख्या घरात असणाऱ्या वस्तू
- आवडते प्राणी, पक्षी

मुलांनी आपले चित्र पूर्ण केल्यानंतर, त्यांना चित्राबद्दलची अधिक माहिती सांगण्यास सांगावे.

## २. आकार

हा उपक्रम दोन स्तरांवर घेता येईल :

१. जी मुले लिहिण्यास शिकत आहेत, त्यांना तुम्ही काही सोपे आकार कागदावर काढून द्यावे. त्यांना त्यासारखे आकार काढण्यास सांगावे. (त्यांनी अचूक, जशीच्या तशी नक्कल करण्याची अपेक्षा ठेवू नका.)

२. ज्या मुलांचे लेखनकौशल्य विकसित झाले आहे व ज्यांना वेगवेगळे आकार काढता येतात, त्यांना चौरस, आयत आणि शंकू (पिरॅमिड) यांसारखे वेगवेगळे भौमितिक आकार वापरून निरनिराळ्या रचना करण्यास सांगावे. हे आकार एकमेकांना झाकणारे (overlapping) असू शकतील.

या आकारांना पेन्सिल किंवा पेन, वापरून तसेच तेलकट खडू, रंगीत पेन्सिली इत्यादींच्या मदतीने रंगवता येईल.

# अनुक्रमणिका

## भाग ३ : ध्वनिमुद्रित संभाषणे


| अ. क्र. | उपक्रम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | परिचय | ७३ |
| १. | **संच १ मधील ध्वनिमुद्रणे** | |
| | १.१ नाव विचारणे | ७७ |
| | १.२ कुठे राहतो ? | ७८ |
| | १.३ आवडते खेळ | ७८ |
| | १.४ आई, बाबा काय करतात ? (भाग १) | ७९ |
| | १.५ माझे कुटुंब | ७९ |
| | १.६ घर आणि परिसर | ८० |
| | १.७ खेळ गप्पा | ८१ |
| | १.८ आई, बाबा काय करतात ? (भाग २) | ८१ |
| | १.९ घरातील माणसे | ८२ |
| | १.१० पत्ता विचारणे व सांगणे | ८२ |
| २ | **संच २ मधील ध्वनिमुद्रणे** | |
| | २.१ शाळेला जाताना | ८४ |
| | २.२ आमची शाळा | ८५ |
| | २.३ आवडता खाऊ | ८६ |
| | २.४ आमचा बोका | ८६ |
| ३ | **संच ३ मधील ध्वनिमुद्रणे** | |
| | ३.१ वर्तमानपत्र | ८८ |
| | ३.२ कामाबद्दल प्रश्न | ८९ |
| | ३.३ शाळेबद्दलची माहिती | ८९ |
| ४ | **संच ४ मधील ध्वनिमुद्रणे** | |
| | ४.१ हॉटेलमध्ये | ९१ |
| | ४.२ बस स्टॉपवरच्या गप्पा | ९२ |
| | ४.३ प्लॅस्टिकच्या पिशव्यांवर बंदी | ९२ |
| ५ | **स्वत:ची ध्वनिमुद्रणे तयार करणे** | ९४ |
| | ध्वनिमुद्रित गोष्टी | ९५ |

## १.७ खेळ गप्पा

एक मुलगा आणि एक मुलगी खेळांबद्दल बोलत आहेत.

**प्रश्नसंच १ :**

- येथे कोण बोलत आहे?
- ते कशाबद्दल बोलत आहेत?
- मुलाला कोणकोणते खेळ आवडतात?
- मुलीला कोणता खेळ आवडतो?
- तुम्ही शाळेमध्ये कोणकोणते खेळ खेळता?
- कुठे खेळता?
- कधी खेळता?

**प्रश्नसंच २ :**

- मुलगी आणि मुलगा कशाबद्दल बोलत आहेत?
- त्यांपैकी पहिल्यांदा कोण बोलले? हे तू कसे ओळखले?
- मुलाला कोणते खेळ खेळायला आवडतात?
- मुलीला लपाछपी खेळायला का आवडत नाही?
- ✻ शहरातून तुमच्या घरी आलेल्या पाहुण्यांच्या मुलीला लगोरी कशी खेळतात हे माहीत नाही. ते तुम्ही तिला कसे समजावून सांगाल?

  (टीप : वर्गातील एकाही मुलाला/मुलीला लगोरी हा खेळ माहीत नसेल तर आधी त्याबद्दल सांगावे.)

**प्रश्नसंच ३ :**

- मुलाला कोणकोणते खेळ खेळायला फारसे आवडत नाहीत? त्याला हे खेळ खेळायला का आवडत नसावे?
- दगड एकमेकांवर ठेवून खेळल्या जाणाऱ्या खेळाचे नाव काय आहे?
- ✻ गटात बसा व 'क्रिकेट' हा खेळ कसा खेळतात, त्यासाठी कोणकोणते साहित्य लागते, या खेळाचे नियम कोणते असतात' याबद्दल चर्चा करा. तुमच्या बोलण्यातील मुख्य मुद्दे वर्गासमोर येऊन सांगा.

  (टीप : मुख्य मुद्दे म्हणजे काय, ते कसे सांगायचे याची सवय मुलांना नसेल तर एखाद्या प्रात्यक्षिकाच्या आधारे मुलांना ते समजून घेण्यास मदत करावी.)

## १.८ आई, बाबा काय करतात? (भाग २)

एक मुलगा आणि एक मुलगी आपापल्या घरातील प्रौढ व्यक्तींच्या नोकरी – व्यवसायासंबंधी बोलत आहेत

**प्रश्नसंच १ :**

- या संवादात मुलगा व मुलगी कशाबद्दल बोलत आहेत?
- मुलीची आई कुठे काम करते?
- तिचे वडील कुठे काम करतात?
- ✻ तुम्हांला तुमच्या गावात राहणारे व दुसऱ्या गावात कामासाठी जाणारे कुणी लोक माहीत आहेत का? त्यांच्याबद्दल गटातील इतर मित्रांना सांगा.




Operational Partner

BJS
भारतीय जैन संघटना

Donor Partner

DAM CAPITAL

Technical Partner

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन